**विशेष दिवाणी दावा क्रमांक – २२/२०२०**
**नि.क्र. १३/क सोबत**

**उलटतपास शपथेवर सुरु**

**उलटतपास प्रतिवादीतर्फे विद्वान वकील श्री. आय.डी. सनदी यांचे तर्फे सुरु :-**

**४.** मी एम.आय.डी.सी मध्ये नोकरी करतो. माझे शिक्षण सहावी पर्यंत मराठी माध्यम मधुन झाले आहे. मी सतिश चव्हाण यांना ओळखत होतो. हे म्हणणे खरे आहे की, सतिश चव्हाण हे मुळचे पट्टणकोडोली येथील रहिवासी नव्हते. मला चांदी व्यवसायाची थोडी फार माहिती आहे. मी पुर्वी चांदीकाम करत होतो. हे मला माहित नाही की, सतिश चव्हाण यांचे पट्टणकोडोली येथे आटणीचे दुकान होते. हे म्हणणे खरे आहे की, वादी यांना मी सतिश चव्हाण यांचे अगोदर पासुन ओळखतो. सतिश चव्हाण आमचे गावात रहात असल्यामुळे मी त्यांना ओळखत होतो. सतिश चव्हाण हे पट्टणकोडोली येथील बजरंग चव्हाण यांच्या घरी भाडयाने रहात होते. हे म्हणणे खरे नाही की, वादीला सावकार म्हणुन ओळखले जाते. मी वादीकडुन कधी ऊसनी रक्कम घेतलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी यांचे मी ऊसनवार घेतलेली रक्कम देणे होतो म्हणुन १०-१६ वर्षापूर्वी गांव सोडून गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, वादी व सतिश चव्हाण हे मला शोधण्यासाठी आले होते.

**५.** चांदी गट (शुध्द चांदी) आणि रुपे (कच्ची चांदी) अशा दोन प्रकारची असते. वादी यांनी सतिश चव्हाण यांना गट प्रकारची चांदी दिली होती. वादी यांनी सतिश चव्हाण यांना ११.८०० ग्रॅम एवढी शुध्द चांदी दिनांक १.११.२०१८ रोजी दिली होती. सदरची चांदी देतेवेळी मी, सतिश चव्हाण, वादी व अनिता मोरे असे हजर होतो. सतिश चव्हाण यांनी वादीकडे दिनांक १.११.२०१८ रोजी एक शंभर रुपयाचा स्टॅम्प दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, सतिश चव्हाण याने दोन स्टँम्प दिले होते. करारात काय लिहिले आहे ते मी वाचले होते. सतिश चव्हाण हा सन २०१९ मध्ये मरण पावला. सतिश चव्हाण मयत झाले नंतर मी त्याच्या घरी सांत्वनासाठी गेलो

नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, मी केवळ सतिश यांस ओळखत असल्याने त्याचे घरी जाणेचा प्रश्न आला नाही. सतिश चव्हाण याचे मृत्युनंतर वादीने मला त्यांचेत व सतिश चव्हाण यांचे मध्ये चांदीचे येणे-देणे व्यवहाराबाबत सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मला साक्षीदार म्हणुन येणेस सांगितले त्यावेळी दिनांक १.११.२०१८ चे व्यवहाराची कल्पना दिली. हे म्हणणे खरे नाही की, वादी व सतिश चव्हाण यांचेमध्ये झालेल्या नि.क्र. १७ वरील करारावरील सतिश चव्हाण यांची सही खोटी आहे.

**६.** नि.क्र. १७ चा करार सतिश यांचे घरी झाला. हे म्हणणे खरे नाही की, वादीने तयार करुन आणलेल्या करारावर मी व सतिशने सही केली. अनिता मोरे व वादी यांचे नाते मला माहित नाही. हे मला माहित नाही की, सतिश चव्हाण यांचेकडून वादीने दोन कोरे स्टँम्प घेतले होते. नि.क्र.१७ वरील माझ्या सहीच्या खाली मी स्वत:चे हस्ताक्षरात माझे नांव लिहिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीने माझे विरुध्द कोर्टात केसीस दाखल केल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सतिश चव्हाण याने वादी कडून कधीही चांदी घेतली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, वादी व सतिश चव्हाण यांचे मधील करारपत्र खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

वा.दा.का.दा. श्रवणोत्तर स्वीकृत्त,

Digitally signed by
GANI MANIK NADAF
Date: 2025.11.04
11:25:33 +0530

दिनांक – ०३.११.२०२५

(जी. एम. नदाफ)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
इचलकरंजी.